N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** दहीवडी
**FIR No.(प्रथम ख़बर क्र.):** 0019 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/01/2025 02:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 13/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/01/2025
**Time From (वेळेपासून):** 15:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:54 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 14/01/2025 **Time (वेळ):** 02:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/01/2025 02:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मौजे दहिवडी ता माण,गावचे हद्दीत पंचायत समिती ,दहिवडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.दादासो श्रीमंत नवले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवलेवाडी,माण,दहीवडी,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवलेवाडी,माण,दहीवडी,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9637685342

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भरत संभाजी जाधव | | | 1. डबरमळा दहिवडी,माण,दहीवडी, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बुवासाहेब जयराम जगदाळे | | | 1. बिदाल,माण,दहीवडी,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब ता.14/01/2025

मी श्री.दादासो श्रीमंत नवले वय-41वर्षे शिक्षण-10वी, व्यवसाय-कॉन्ट्रक्टर रा.नवलेवाडी ता.माण जि.सातारा मो. नं.9637685342

मी दिनांक13/01/2025रोजी ए.सी.बी सातारा येथील डीवायएसपी श्री.राजेश वाघमारे साहेब यांना फोन करुन माझ्याकडे करण्यात येणारा लाचेच्या मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगितली परंतु मला एसीबी सातारा कार्यालयात येण्यास जमणार नाही तरी तुम्हीच दहिवडी जि.सातारा येथे येवुन तक्रारी नुसार कारवाई करावी ही विनंती मी डीवायएसपी वाघमारे साहेब यांना केली. त्यावर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला कारवाईचे पुढील नियोजन थोडक्यात सांगितले.

त्या नियोजनानुसार दिनांक13/01/2025रोजी सकाळी 11.55वाचे सुमारास डीवायएसपी, वाघमारे साहेब यांचे सुचनेनुसार मी माझी चारचाकी मारुती स्विफ्ट कार MH.12 PH.1658यामधून दहिवडी येथील रिलायन्स पेट्रोल पंपासमोर असलेले इंगळे मैदान येथे आलो असता त्या ठिकाणी डीवायएसपी श्री राजेश वसंत वाघमारे हे त्यांचे सहका-यांसह शासकीय वाहनामध्ये हजर होते. तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला त्यांचे शासकीय वाहनात बसवुन माझी ओळख करुन घेवुन त्यांचे सह असणा-या दोन पंचांची व इतर सहका-यांची एकमेकांना ओळख करुन दिली डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी त्यांना तक्रार सांगितली की, माझी गुरुकृपा मजूर सहकारी संस्था, नवलेवाडी ता.माण जि.सातारा नावाची नोंदणीकृत फर्म आहे त्याचा नोंदणी क्रमांक मजूर सहकारी संस्था जिल्हा परिषद नोंदणी क्रमांक प्र.क्र/33/23-2024असा आहे. सदर नोंदणीकृत परवाना हा पाच वर्षासाठी देण्यात येतो सध्या मी दिनांक19/01/2024रोजी परवाना घेतलेला आहे त्या अंतर्गत मी जिल्हा परिषद सातारा बांधकाम विभागाकडून मिळणारे बांधकामाची कामे करतो.

मौजे उकिर्डे ता माण जि सातारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे खोली बांधणेचे कामाची निविदा प्रसिध्द झाले नंतर सदर कामाची वर्क ऑर्डर दिनांक02/02/2024रोजी करार नामा क्रमांक साजिप/बांध/(द)/ब-1निवीदा/लेखा-5/62/2024दिनांक02/02/2024अन्वये निघाली होती त्याची निवीदा किंमत 9,70,138/- रुपयांना मंजूर झाली होती त्यानुसार मी मौजे उकिर्डे ता माण येथील शाळेच्या खोलीच्या बांधकामाचे काम पूर्ण केले आहे. काम पूर्ण झालेनंतर दिनांक03/01/2025रोजी दुपारी 02.00वाचे सुमारास कामाचे तपासणीसाठी जाधव साहेब हे उकिर्डे या गावी आले व त्यांनी कामाची मापे घेतली त्यावेळी मी त्यांना माझ्या कामाचे बिल लवकर काढा असे सांगितले असता त्यांनी मला तुझे बिल लवकर मंजुरीसाठी पाठवायचे असेल तर मला वीस हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना वर्क ऑर्डरप्रमाणे काम पूर्ण केले आहे असे सांगितले त्यावेळी त्यांनी मला वीस हजार रूपये आत्ता दे मी तुझे कामाचे मोजमाप करुन बिल लवकर मंजूरीसाठी पाठवतो असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना मझ्याकडे सध्या पैसे नाहीत असे सांगितले असता त्यांनी जेवढे जवळ आहेत तेवढे आत्ता दे व बाकीचे नंतर दे असे सांगितले. जाधव साहेब यांना पैसे दिले नाहीत तर ते माझ्या कामाचे बिल मंजुरीसाठी पाठविणार नाहीत याची माझी खात्री झाल्याने तेव्हा मी त्यांना घाबरुन माझ्याकडील पाच हजार रुपये दिले होते.तेव्हा जाधव साहेब यांनी मला उर्वरित 15हजार रुपये सोमवार दिनांक13/01/2025रोजी पंचायत समिती बांधकाम विभाग कार्यालय दहिवडी येथे येवुन देण्यास सांगितले आहे. जाधव साहेब हे माझ्याकडे मागणी करत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे.

तरी मी आज दिनांक13/01/2025रोजी पंचायत समिती दहिवडी येथील बांधकाम विभागाचे जाधव साहेब यांची भेट घेणार आहे व त्यांनी माझ्याकडे केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत चर्चा करणार आहेत. त्यांना लाच रक्कम देण्याची माझी मुळीच इच्छा नाही ते लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार मी पंचासमक्ष डीवायएसपी वाघमारे साहेब यांना सांगितले व माझी हातान लिहिलेली तक्रार डीवायएसपी वाघमारे यांना दिली असात डीवायएसपी

वाघमारे साहेब व पंचांनी ती वाचून बघितली व त्यावर सह्या केल्या.
त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावुन सांगितली. त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या टी शर्टच्या आतमध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने वॉईस रेकॉर्डर सुरु करुन लावुन दिले व तेथुन 14.07वा चे सुमारास मी व पंच नं.1गौरव रविंद्र माने असे माझेकडील मारुती स्वीफ्ट चारचाकी गाडी मधून बांधकाम विभाग, पंचायत समिती, दहिवडी येथील लोकसेवक जाधव, ज्युनिअर इंजिनीअर यांची भेट घेणेकामी रवाना झालो त्यावेळी डीवायएसपी वाघमारे साहेब व त्यांचे सहकारी त्यांचे वाहनात इंगळे मैदान, दहिवडी येथेच थांबून राहिले.
मी व पंच नं.1 गौरव माने असे पंचायत समिती, दहिवडी येथे पाठीमागे वाहन थांबवुन तेथुन उपअभियंता, जि.प. बांधकाम विभाग, दहिवडी या कार्यालयामध्ये आलो. त्यावेळी लोकसेवक जाधव हे आपल्या टेबलवर बसलेले होते मी माझे कामासंदर्भाने त्यांचेशी चर्चा केली या चर्चेदरम्यान मी त्यांना, हीचं मला सांगा कायकाय कस कस करु, असे म्हणालो असता लोकसेवक जाधव हे काय मी, काय बोलणार आता, काय बोलणार, तुला काय बोलायच, मी तरी काय म्हणणार असे म्हणाले त्यावर मी त्यांना, पण ऐका की, मी पाच दिल आत्ता अजून किती द्यायच असे म्हणालो तेव्हा लोकसेवक जाधव हे, तुझ्या हेण दे असे म्हणून कामासंबंधी चर्चा केली त्यामध्ये लोकसेवक जाधव हे, ते करणार हाय का, असे म्हणाले तेव्हा मी त्यांना हो म्हणालो असता, त्यांनी मग टाक की करुन असे म्हणाले तेव्हा मी त्यांना किती पण सांगा की असे म्हणालो तेव्हा ते मला नाय तुझ्या ह्याण दे असे म्हणाले त्यानंतर मी त्यांना, सांगा की एवढ म्हणजे अंदाज तरी मला कळु दे की असे म्हणालो असता सदर वेळी लोकसेवक जाधव यांनी त्यांचे डावे हाताचे तळहातावर पेनाने 20,000/-असे लिहून मला दाखवुन, ही तरी कर की एवढ तरी असे म्हणाले असता मी त्यांना, किती वीस हजार, त्यातल पहिले पाच, पंधरा हजार, कारण मला बी त्यात परवडणार नाय त्यावर लोकसेवक जाधव यांनी त्यास मान हालवुन होकार दिल्याने मी त्यांना, आलो पंधरा वीस मिनीटात असे म्हणून तेथुन मी व पंच नं.1माने असे माझे चारचाकी मारुती स्वीफ्ट वाहनामधुन डीवायएसपी वाघमारे साहेब व पथक थांबले वाहनाजवळ परत 14.37वा चे सुमारास आलो तेव्हा त्यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरुन घडलेली हकीगत सांगितली तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करुन घेतली की, उपअभियंता जि.प. बांधकाम विभाग दहिवडी या कार्यालयातील शाखा अभियंता, भरत जाधव हे माझ्याकडे 20,000/-रक्कम लाचेची मागणी करुन 15,000/- रुपये लाच रक्कम आणून देण्यास सांगितले आहे. तशी डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचांची खात्री झाल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचानी घेतला.
त्यानुसार लागलीच डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला व पंचाना सापळा पूर्व व सापळा कारवाईची माहिती थोडक्यात सांगून प्रक्रिया समजावुन सांगितली तसेच वेळेच्या अभावी पडताळणी पंचनामा तसेच संभाषण स्क्रिप्ट नंतर टाईप करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर मी डीवायएसपी वाघमारे साहेब यांचे सांगणेवरुन माझेकडे असलेली 15,000/-हजार रुपये लाचेची रक्कम म्हणून पंचासमक्ष हजर केली त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी दिले सुचनेवरुन सहका-यांने मी हजर केलेल्या लाचेच्या रकमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगितले त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब व त्यांच्या सहका-यांनी पंचासमक्ष सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई पूर्ण केली त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रकमेच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रासिन पावडर लावली व सदरची अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाच रकम ही माझे पॅण्टचे पुढील उजव्या बाजूचे खिशात ठेवुन दिली व लोकसेवक जाधव यांना लाच रक्कम दिल्यानंतर डाव्या हाताने डोक्यावरुन दोनदा हात फिरवुन इशारा करण्याच्या सुचना डिवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला दिल्या.
त्यानंतर डिवायएसपी वाघमारे साहेब यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या टी शर्टच्या आतमध्ये असलेल्या बनियनला पिनच्या साहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन लावुन दिले व तेथुन 15.11वा चे सुमारास मी व पंच नं.1गौरव माने असे आम्ही माझेकडील मारुती स्विफ्ट गाडीमधून पंचायत समिती कार्यालयातील बांधकाम विभागातील लोकसेवक जाधव यांची भेट घेणेकामी रवाना झालो आमचे पाठोपाठ डिवायएसपी वाघमारे साहेब व सापळा पथक हे त्यांचे शासकीय वाहनातून आले. मी माझे वाहन पंचायत समितीचे पाठीमागे पार्किंमध्ये उभी करुन मी व पंच नं.1माने असे त्या कार्यालयात गेलो. त्यावेळी सापळा पथक पंचायत समिती दहिवडी आवारात कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबून राहिलो. मी व पंच नं.1 माने यांचे समवेत लोकसेवक भरत जाधव यांची उपअभियंता जि.प.बांधकाम विभाग दहिवडी गेलो असता त्या ठिकाणी जाधव हे हजर नसलेने मी तेथील कर्मचारी यांना कुठे गेलेत रावसाहेब जाधव रावसाहेब आत गेलेत का

साहेब जाधव रावसाहेब आतमध्ये आहेत का असे म्हणालो त्यांनी हो आहेत असे म्हणाले. थोड्या वेळानी मी त्यांना किती वेळ झाला मिटींग चालु होवुन असे म्हणालो असता त्यांनी मला चार वाजणार, वेळ होणार असे सांगितले त्यामुळे मी व पंच नं.1माने त्या ठिकाणी थांबुन राहिलो काही वेळानंतर लोकसेवक जाधव व त्यांचेसोबत कॉन्ट्रॅक्टर जगदाळे हे आले. तेव्हा जाधव यांनी माझ्याकडे पाहून उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन त्यांचेकडे देवुन टाका असे म्हणाले तेव्हा मी माझ्याकडील अन्थ्रासिन पावडर लावलेली 15,000/-रुपये रक्कम त्यांचे शेजारी असलेले जगदाळे कॉन्ट्रॅक्टर यांचेकडे दिली तेव्हा जगदाळे कॉन्ट्रॅक्टर हे मला किती आहेत असे म्हणाले तेव्ही मी त्यांना पंधरा हजार आहेत असे म्हणाले तेव्हा जगदाळे कॉन्ट्रॅक्टर हे ह्यांच्याकड देवु ना मोजायला नको ना असे म्हणाले असता मी त्यांना नको मोजायला पण ऐका की जाधव रावसाहेबांना द्या असे म्हणालो तेव्हा जगदाळे कॉन्ट्रॅक्टर हे मग ते काय सांगतायत की असे म्हणाले असता मी त्यांना हो तेच की असे म्हणून मी कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने पूर्वनियोजीत डाव्या हाताने दोन वेळा डोक्यावरुन हात फिरवुन इशारा केला असता डिवायएसपी वाघमारे साहेब यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला व त्यांचे सहका-यांनी लोकसेवक जाधव यांना ताब्यात घेतले ती वेळ 15.49वा.चे सुमारास होती. तेव्हा डिवायएसपी वाघमारे साहेब यांनी लोकसेवक जाधव यांना त्यांची ओळख सांगुन पंच नं.1यांना लाचेची रक्कम कोणी स्वीकारली याबाबत विचारणा केली असता लाच रक्कम ही शेजारी उभ्या असलेल्या इसमाने स्विकारली असल्याची सांगीतले त्यानंतर शेजारी उभ्या असलेल्या इसमास डीवायएसपी वाघमारे यांनी त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बुवासाहेब जयराम जगदाळे असे सांगितले व ते खाजगी कॉन्ट्रॅक्टर असल्याचे सांगितले. त्यावेळी बुवासाहेब जगदाळे यांना डिवायएसपी वाघमारे साहेब यांनी अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाच रक्कमेसह ताब्यात घेतली ती वेळ15. 54वाची होती.

त्यानंतर डिवायएसपी वाघमारे साहेब यांनी त्यांचे शासकीय वाहनामध्ये बसवुन सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले तसेच अँन्थ्रासिन पावडर लागलेल्या नोटांची व आमच्या हाताची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली व सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह दहिवडी येथे जावुन करण्याचे निश्चीत केले. तरी दिनांक13/01/2025रोजी 1)लोकसेवक भरत सभाजी जाधव वय-54वर्षे पद-शाखा अभियंता, उपअभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद सातारा उपविभाग दहिवडी रा.डबरमळा दहिवडी ता माण जि.सातारा यांनी मी पूर्ण केलेल्या शाळा बांधकामाचे मोजमाप करुन बिल मंजूरीकरिता पाठविणेसाठी 20,000 /-रुपये लाचेची मागणी करुन 15,000/-रुपये लाच रक्कम ही खाजगी इसम कॉन्ट्रॅक्टर 2)श्री बुवासाहेब जयराम जगदाळे वय-61 वर्षे व्यवसाय खाजगी व सरकारी कॉन्ट्रॅक्टर रा.बिदाल ता.माण जि.सातारा यांते हस्ते उपअभियंता बांधकाम विभाग जि.प.पंचायत समिती दहिवडी या ठिकाणी स्विकारली आहे म्हणून माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आला असुन तो बरोबर असलेची खात्री करुन मी त्यावर सही केली आहे.

हा जबाब दिला

समक्ष

(टी.एल.खाडे)
मपोहवा ब.नं.1812
पोलीस स्टेशन ऑफिसर
दहिवडी पोलीस स्टेशन

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

AKSHAY APPA SONAWANE(I (Inspector)) / API **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ऑफिसर
इंदिरा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** AKSHAY APPA SONA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API